# वार्षिक अहवाल २०२०-२१.

प्रेम बहुउद्देशिय संख्या नाशिक द्वारा सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात नाशिक व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील गावांमधील विविध घटकांच्या सक्षमीकरणा साठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या सर्व कार्यक्रमांच्या सविस्तर माहितीचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे -

**1) बाल सभा मंच-** युनिसेफ व सोशियल सर्विस सेंटर,मुंबई यांच्या सहयोगाने नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुआँ तालुक्यातील10 अतिदुर्गम आदिवासी गावातील ०६ ते १८ वर्षे वयापर्यंतच्या बालकांसोबत त्यांना त्यांच्या हक्क आणि अधिकारांची जाणिव व्हावी म्हणून दहाही गावात स्थापन झालेल्या बाल सभा मंचाची मासिक सभा नियमित पणे पार पडल्या आहेत.या सभांच्या माध्यमातून बालकांची क्षमता बांधणी व्हावी म्हणून विविध खेळ,गाणे,गोष्टी, नाट्य इ. माध्यमांचा वापर करुन बालकांची प्रशिक्षणं घेण्यात आली. सोबतच त्यांच्या माहितीत भर पडण्याच्या व व्यक्तीमत्व विकासाच्या अनुषंगाने या बालकांची विविध शासकीय आस्थापनांना भेटी, आस्थापना प्रमुखांशी भेट व चर्चा इ. घडवून आणण्यात आल्या.या सर्व उपक्रमांमध्ये सातत्याने १४४० बालकांनी सहभाग घेतला तर या कामी शालेय व्यवस्थापन समिती, शालेय शिक्षक, बालक पालक शिक्षक संघांचे प्रतिनिधी इ. मोलाचे सहकार्य करीत आहेत.

**२) युवा मेळावा आणि युवक क्षमता बांधणी -** १२ ऑगस्ट २०२० या जागतिक युवा दिनाचे औचित्य साधुन नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील १० गावातील 'युवक-युवतींचा मेळावा “तोडीकुंड” येथे घेण्यात आला. या मेळाव्यात “रोजगार विषयक उद्योजकता विकास “यावर श्री नितीन सोनवणे या साधन व्यक्तीच्या मदतीने सविस्तर चर्चा व मार्गदर्शन घडुन आले. मेळाव्यात पुढील नियोजन करतांना युवकांनी मोटर सायकल गॅरेज, मोबाईल दुरुस्ती, पशुपालन, व्यापारी शेती, कृषी उत्पादित मालावर आधारीत प्रक्रीया उद्योग, बांबु पासुन साहीत्य निर्मीती,मधमाशी पालन,पर्यटन केंद्र इ. प्रकारचे व्यवसाय करण्याचे ठरले.या साठी योग्य ती मदत व मार्गदर्शन तसेच प्रस्ताव बनवून ते सादर करण्यासाठीची तांत्रिक मदत व मार्गदर्शन करण्याचे श्री. नितिन सोनवणे यांनी आश्वासन दिले.

**३) शेतीशाळा/कृषी दिन -** नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील पाच प्रकल्प गावांमधील शेतकऱ्यांच्या शेती शाळा घेण्यात आल्या. या गावांमध्ये झालेल्या २० कृषीशाळांमध्ये एकुण ४५८ शेतकरी महीला-पुरुषांनी सहभाग घेतला तर नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातीलप्रकल्प क्षेत्रातील दहा गावांमधील शेतकऱ्यांच्या शेती शाळा घेण्यात आल्या. या गावांमध्ये झालेल्या ३० या कृषीशाळांमध्ये एकुण १२९० शेतकरी महीला-पुरुषांनी सहभाग घेतला. अशा एकुण ५० कृषीशाळांमध्ये एकुण १७४८ शेतकरी महीला-पुरुषांनी सहभाग घेतला या कृषी दिन तथा शेती शाळांच्या माध्यमातून सेंद्रीय शेतीचे महत्व आणि वापर, अल्पखर्ची तंत्रज्ञानाचा वापर, परंपरागत बियाण्यांचा वापर, इ. बाबींचे सविस्तर मार्गदर्शन श्री.संजय थेटे,श्री.अरुण होळकर,श्री.अण्णा पान पाटील,श्री.शांताराम गभाले यांनी केले. सोबतच जीवामृत, बिजामृत,दशपर्णी अर्क,बीज प्रक्रिया, गांडूळ

खताचा वापर, निंबोळी पेंड, निंबोळी अर्क इ.प्रक्रिया आणि तिचा वापर इ.विषयीचे सविस्तर मार्गदर्शन या साधन व्यक्तींच्या माध्यमातून करण्यात आले.

**४) परसबाग प्रशिक्षण व लागवड -** आदिवासी बहुल क्षेत्रातील व्यक्तींना योग्य व पुरक असा जीवनसत्व युक्त आहार उपलब्ध व्हावा. व त्यातून त्यांचे आरोग्य सुस्थितीत राहावे ह्या उद्धेशाने इगतपुरी तालुक्यातील बारशिंगवे, वासाळी, इंदोरे, खड्केद, आंबेवाडी या आदिवासी गावातील ५७ महिलांचे १७ जुन २०२१ रोजी एक दिवशीय परसबाग लागवड प्रशिक्षण नाशिक येथे घेण्यात आले .





या प्रशिक्षणासाठी श्री.अरुण होळकर यांनी साधनव्यक्ती म्हणुन मार्गदर्शन केले. यात प्रामुख्याने परसबाग म्हणजे काय ? परसबागेचे फायदे-तोटे ? परसबाग कुठे व कशी लावावी ? परसबागे साठी कुठल्या बियाणांचा,खतांचा व औषधांचा वापर करावा ? इ. बाबींची सविस्तर माहिती उपस्थित महिलांना देण्यात आली.सोबत १३ प्रकारचे भाजीपालावर्गीय बियाण्याचे वाटप करण्यात आले.यात प्रामुख्याने - मिरची, टमाटा, मुळा, दोडके, गिलके, कारले, भोपळा, वाल,चवळी,दुधी भोपळा,शेवगा,घेवडा,इ. चा समावेश होता.

**५) महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण -** प्रकल्प क्षेत्रातील प्रत्येक गावातून गरीब, गरजू, विधवा, परितकत्या अशा २२० महिलांची पाच गावे मिळून ११०० महिलांची निवड केलेली आहे. या महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणासाठीचे काम संस्था करीत आहे, यात या महिलांसाठी विविध प्रशिक्षणे.मार्गदर्शन शिबिर व अर्थ पुरवठा करुन त्या सर्व महिलांसाठी विविध व्यवसाय उभे करणे व त्या व्यवसायातुन रोजगार उपलब्ध करुन त्यांचे जिवनमानात सुधारणा करण्यासाठी त्यांनी निवडलेल्या उद्योग - व्यवसाय निहाय उत्पादक गटांची उभारणी केलेली आहे . यात किमान ७ तर कमाल २० महिला सदस्य आहेत अशा पाच गाव मिळून ७० उत्पादक गटांची उभारणी करण्यात आली आहे.या उत्पादक गटांना व्यक्तीगत पातळीवर व गट पातळीवर फिरत्या निधीच्या माध्यमातून निधी पुरवला जावून त्यातून उद्योग / व्यवसाय उभारणी करणे व त्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचे काम चालु आहे.

**ग्रामसंघ -** तसेच या गाव पातळीवर उभारण्यात आलेल्या उत्पादक गटांचे सनियंत्रण, मुल्यांकन, निधीपुरवठा, तंत्रपुरवठा, बाजारपेठ व गरज आणि मागणीनुसार मदत आणि मार्गदर्शन होण्याच्या दृष्टीने या उत्पादक गटातील महिलांच्या पदाधिका-यां मधून सक्रीय व होतकरू अशा अकरा सदस्यांचा मिळुन "ग्रामसंघ " तयार

करण्यात आला आहे .उत्पादक गट व ग्रामसंघ यांचे मार्फत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे काम पुढे सुरु आहे. त्या संदर्भाने "फिरता निधी" चा विनियोग हा देखील याच उत्पादक गट व ग्रामसंघाच्या मार्फत केला जात आहे. या करिता ग्रामसंघ व उत्पादक गटाचे स्वतंत्र बँक खाते उघडण्यात आले आहेत. ग्रामसंघ व उत्पादक गट यांना मदत व मार्गदर्शनासाठी संस्थेचे प्रकल्प संचालक, प्रभाग व्यवस्थापक, प्रत्येक गावात एक पुर्ण वेळ प्रेरणा सखी असा प्रशिक्षित व अनुभवी कर्मचारी वर्ग आहे.

| अ.क्र. | ग्रामसंघाचे नाव | गाव | स्थापना दिनांक | सदस्य संख्या | उत्पादक गट संख्या | सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामोन्नती महिला ग्रामसंघ | आंबेवाडी | २ ऑगस्ट २०१८ | ११ | १५ | २२० |
| २ | प्रगती महिला ग्रामसंघ | ख़ड्केद | ४ नोव्हेबर २०१८ | ११ | १४ | २२० |
| ३ | कळसुबाई महिला ग्रामसंघ | इंदोरे | ३ नोव्हेबर २०१८ | ११ | १३ | २२० |
| ४ | राणी तारामती महिला ग्रामसंघ | वासाळी | ५ नोव्हेबर २०१८ | ११ | १३ | २२० |
| ५ | सह्याद्री महिला ग्रामसंघ | बारशिंगवे | १ नोव्हेबर २०१८ | ११ | १५ | २२० |
|  | **एकुण** |  |  | **५५** | **७०** | **११००** |






❖ **प्रशिक्षणे :-** उत्पादक गट व ग्रामसंघतील सदस्यासाठी व्यवसायानुसार विविध प्रशिक्षणे घेवुन त्यांच्या कौशल्यात आधुनिकता व व्यवहारिक द्रुष्टीकोन जागरुक करण्यासाठी संस्थेमार्फत तज्ञ मार्गदर्शक व्यक्तीच्या सहाय्याने खालील प्रशिक्षणे घेतली.

| अनु.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | प्रशिक्षणाची संख्या | प्रशिक्षण घेतलेले सदस्य |
|---|---|---|---|
| १ | जाणीव जागृती कार्यक्रम | १० | ९२७ |
| २ | परसबाग लागवड प्रशिक्षण | १० | ७० |
| ३ | शासकिय योजनाचे प्रशिक्षण | २० | ६०० |
| ४ | गट बांधणी प्रशिक्षण | १० | ५०४ |
| ५ | ग्रामसंघ व्यवस्थापन प्रशिक्षण | १० | २१७ |
| ६ | डिजिटल साक्षरता प्रशिक्षण | १० | १८ |
| ७ | वितीय साक्षरता प्रशिक्षण | ५ | २०९ |
| ८ | कौशल्यवृध्दी प्रशिक्षण | ४५ | १७२० |
| ९ | उद्योजकता विकास प्रशिक्षण | ४५ | १८२६ |
| १० | शेती शाळा प्रशिक्षण | ८० | १३१८ |
| ११ | कृषी दिन प्रशिक्षण | १० | ४३९ |
| १२ | स्क्रीन पेंटिंग प्रशिक्षण | १ | ३० |
| १३ | मुरमुरा प्रशिक्षण | १ | ३० |
| | **एकुण** | **२३७** | **७९०८** |









**फिरत्या निधीतुन प्रकल्पात सुरु केले व्यवसाय** -:प्रकल्पातील काही होतकरु माहिला ज्या काही व्यवसाय करु इच्छीत होत्या त्यांना संस्थेमार्फत प्रकल्पातुन सुक्ष्म अर्थसहाय्य करुन खालील व्यवसाय संस्थेच्या मार्गदर्शनाने सुरु आहे.

प्रेम बहुउद्देशिय संस्था, नाशिक
रजि.नं. एफ-13529/12 नाशिक

| अनु.क्र. | व्यवसायाचे नाव | सन २०१८-१९ | सन २०१९-२० | एकुण व्यवसायाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कुकुट्पालन व्यवसाय | ५० | ६ | ५९ |
| २ | शेळीपालन | २५ | ५२ | ८८ |
| ३ | शिवणकाम | १० | १६ | २६ |
| ४ | किराणा दुकान | २ | ६ | १० |
| ५ | मंडप व्यवसाय | ० | ६ | ६ |
| ६ | दुग्ध व्यवसाय | ० | १६ | १९ |
| ७ | भाजीपाला | ० | ३ | ३ |
| ८ | हॉटेल व्यवसाय | ० | ६ | ८ |
| ९ | झेरोक्स | ० | २ | २ |
| १० | पाईप लाईन | ० | ८ | ८ |
| ११ | कुरडई मशिन | ० | १ | १ |
| १२ | साडी दुकान | ० | १ | १ |
| १३ | गिरणी व्यवसाय | ० | २ | २ |
| १४ | बोंबिल व्यवसाय | ० | १ | १ |
| १५ | शेवई मशिन | ० | १ | १ |
| १६ | ब्युटी पार्लर | ० | १ | १ |
| | **एकुण** | ८७ | १२८ | २४२ |









<stamp>









❖ **प्रकल्पातुन वाटप केलेला फिरता निधी.**

प्रत्येक ग्रामसंघातुन आज पर्यंत सदस्या पर्यंत खालील प्रमाणात फिरता निधी वाटप केला आहे.

| अ.नं. | वैयक्तिक व्यवसायासाठी फिरता निधी वाटप. | रक्कम | सामुहिक व्यवसायासाठी ग्रामसंघाला निधी वाटप | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | फिरता निधी आंबेवाडी (४५ लाभार्थी) | ३३७५०० | ग्रामसंघाला निधी आंबेवाडी | १००००० |
| २ | फिरता निधी ख़ड्केद (४५ लाभार्थी) | ३३७५०० | ग्रामसंघाला निधी ख़ड्केद | १००००० |
| ३ | फिरता निधी इंदोरे (४५ लाभार्थी) | ३३७५०० | ग्रामसंघाला निधी इंदोरे | १००००० |
| ४ | फिरता निधी वासाळी (४५ लाभार्थी) | ३३७५०० | ग्रामसंघाला निधी वासाळी | १००००० |
| ५ | फिरता निधी बारशिंगवे (४५ लाभार्थी) | ३३७५०० | ग्रामसंघाला निधी बारशिंगवे | १००००० |
| | एकुण | १६८७५०० | | ५००००० |
| | **एकुण निधी वाटप २१,८७,५००/- रुपये** | | | |


या सोबतच कृषी दिन,परसबाग लागवड, अल्पखर्ची तंत्रज्ञानाचा वापर, कोविड-१९ च्या कालावधीतील कौटुंबिक सर्वेक्षण, लसीकरण जनजागृती, मास्क, स्यानीटायझरचा वापर, सुरक्षित अंतर इ.चा संदेश,मोफत

रेशन वाटप,मास्क वाटप,तसेच ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय योजनांचा प्रचार व लाभ,गृहभेटी तुन कौटुंबिक संवाद असे अनेकविध उपक्रम राबविण्यात आलेले आहेत.

**७) प्रेमांकुर समुपदेशन केंद्र -** महिलांसोबत महिलांचे सक्षमीकरण करीत असताना महिला व बालकांसोबत होणाऱ्या अन्याय - अत्याचाराला वाचा फोडता यावी व त्यातून त्यांना न्याय मिळावा यासाठी नाशिक येथील कार्यालयातील कक्षात "प्रेमांकुर" समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले आहे.यात प्रामुख्याने कौटुंबिक सल्ला व समुपदेशन, मुलांच्या समस्या व शैक्षणिक समुपदेशन, विवाह विषयक व विवाह पूर्व समुपदेशन, विद्यार्थी-पालक समुपदेशन,वैयक्तिक समुपदेशन,बुद्धीमत्ताचाचणी,कल चाचणी,व्यक्तीमत्व चाचणी, बौद्धीक असंतुलन, भीती, वेडेपणा,चिडचिड भास होणे, राग येणे, चिंता वाटणे, मानसिक समस्या, दारू ,गांजा, ड्रग्ज, सिगारेट, स्मृतीभ्रंश, बौद्धीक साशंकता, योग थेरेपी, मानसिक संतुलन थेरेपी, म्युझिक थेरेपी, तनाव व्यवस्थापन, राग व्यवस्थापन, ध्यान-धारण (मेडीटेशन) प्रेरणादायी व्याख्यान इ. चा वापरातून महिला, मुले व त्यांचे कुटुंबीय यांना मदत व मार्गदर्शन करण्याचे काम केले जाते.या वर्षी कोविड-19 ची भितीदायक अशी परिस्थीती असल्याने फारसा प्रतिसाद लाभला नसला तरी या केंद्राचा ९६७ लाभार्थींनी लाभ घेतला आहे.

**८) कोविड-19 जनजागृती, मदत व मार्गदर्शन -** कोविड-19 ची परिस्थीती पाहता लोकांना कोविड-१९ची योग्य व तंत्र शुद्ध माहिती व्हावी,सोबतच गाव आणि ग्रामपंचायती यांच्या कामासही हातभार लागावा म्हणून संस्था कार्यकर्त्यांच्या मदतीने सर्वेक्षण, गृह भेटी, मास्क लावणे, हात साबणाने स्वच्छ धुणे,सानिटायझरचा नियमित वापर,सुरक्षित अंतर,तापमान मोजणी इ.विषयीची जनजागृती घरोघरी भेट देवून करण्यात आली.






सोबतच शासना मार्फत दिले जाणारे मोफत धान्य उपलब्ध करून देण्यास मदत करणे, खावटी कर्ज ,पोषण आहार, उज्ज्वला गॅस योजना, मोफत बी-बियाणे, पिक विमा, कुक्कुटपालन शेड, शेळीपालन शेड या सारख्या उपजिविकेस सहाय्यभूत ठरणाऱ्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी मदत व मार्गदर्शन करण्यात आले. यातून जवळपास ३००० लाभार्थ्यांना लाभ मिळाला.









या व अशा अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून ही समाज विकासाचे काम या वर्षभरात करण्यात आले. या कामी संस्थेच्या सर्व कार्यकर्ता वर्गाची मेहनत खुप मोलाची ठरली. सोबतच, अफार्म संस्था पुणे, इंडियो एअरलाईन्स कंपनी, युनिसेफ,सेंटर फोर सोशियल सर्व्हिस मुंबई, महात्मा फुले समाज सेवा मंडळ, सावली संस्था, गोदावरी कन्सल्टन्सी सर्व्हीसेस नाशिक, सक्सेस ग्लोबल फाउंडेशन ,एन.जी.ओ. फोरम नाशिक यासह कृषी विभाग, महसूल विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग,आरोग्य विभाग या सारखे विविध शासकीय विभाग आणि विविध स्वयंसेवी संस्थांची नेटवर्कस, ग्रामपंचायती, स्थानिक लोकप्रतिनिधी.ज्ञात-अज्ञातांची खुप मोलाची मदत झाली.संस्था या सर्वांच्या कायम ऋणात राहु इच्छिते. या सर्वांचे शतशः आभार.

प्रेम बहुउद्देशिय संस्था, नाशिक
रजि.नं. एफ-13525/12 नाशिक

अध्यक्ष
प्रेम बहुउद्देशिय संस्था
नाशिक.